


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६२५ . वा | मंगळवार | दि. १२ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# जिजाऊ बँकेच्या भ्रष्टाचाराच्या विरोधात मंत्रालयावर पुन्हा उपोषण...

## मागील उपोषणातील आश्वासनांची शासनाने पुर्तता न केल्याचा उपोषणकर्त्यांचा आरोप...

**जनसंचलन/ बुलढाणा**

अमरावती येथील जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेचे अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे व त्यांच्या काही लुटारू संचालकांच्या भ्रष्ट कारभाराच्या विरोधात नागपूर येथे सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयावर १३ डिसेंबरपासून उपोषणाला सुरवात होते आहे. मागील वर्षीदेखील अधिवेशनात झालेल्या उपोषणादरम्यान दिलेल्या आश्वासनांची सरकारने योग्य ती दखल घेतली नसल्याने यंदा पुन्हा उपोषणाचे हत्यार उपसण्याचा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला आहे. दरम्यान, जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेतील भ्रष्टाचार प्रकरणी सहकार आयुक्त अत्यंत बोटचेपी भूमिका घेत असल्याचा उपोषणकर्त्यांचा आरोप आहे. जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक अमरावती या संस्थेत बोकाळलेल्या अनिर्बंध भ्रष्टाचाराच्या संदर्भात सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन सातत्याने आवाज उठवत असून, या माध्यमातून आम्ही बँकेचे ठेवीदार, ग्राहक, भागधारक यांना जागृत करण्याचा प्रयत्न करीत आहोत. बँकेचे अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे हे अत्यंत हिटलरशाही व्यक्तिमत्व असून, त्यांनी आजवर बँकेचा कारभार करताना प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे. या भ्रष्टाचारातून कोठाळे यांनी मोठ्या प्रमाणात बेनामी संपत्ती देखील जमवली आहे. या कामात कोठाळे

**जिजाऊ कमर्शियल अमरावती बँकेचा प्रताप भाग–१९९**

यांच्याप्रमाणेच त्यांचे काही सहकारी संचालक देखील मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. संचालकांनीही केवळ स्वतःच्या तुंबड्या भरण्याचे काम केलेले आहे. परंतु एकीकडे कोठाळे व त्यांचे संचालक चांगलेच गबर होत गेले, परंतु त्यातून मोठ्या प्रमाणात बँकेला फटका सहन करावा लागला आहे. दिवसेंदिवस बँकेची स्थिती खालावत चालली आहे. बहुजन समाजाच्या हितासाठी स्थापन करण्यात आलेली ही बँक आज बहुजनांच्या ऐवजी केवळ कोठाळे व त्यांच्या काही लुटारू संचालकांचे, तसेच त्यांच्या मर्जीतील मूठभर लोकांचे भले करीत आहे. ही स्थिती बदलली नाही तर बँक डबघाईला आल्याशिवाय राहणार नाही. ही स्थिती पाहून बँकेच्या काही हितचिंतकांनी बँक वाचवण्यासाठी आता जोरदार पुढाकार घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून १३ डिसेंबरपासून उपोषणाची नोटीस देण्यात आली आहे. ही नोटीस देणाऱ्यांमध्ये उत्तम चरपे, बाळासाहेब वैद्य, सुरेश उमक, दिगंबर पुरी आणि स्वप्नील देशमुख यांचा समावेश आहे. हे सर्व जण दि. १३ डिसेंबरपासून नागपूरच्या मंत्रालयासमोर उपोषणाला बसणार आहेत. विशेष म्हणजे मागील वर्षी हिवाळी अधिवेशनात देखील हे सर्व जण उपोषणाला बसले होते. मात्र, त्या वेळी सहकार आयुक्त सुनील कवडे पुणे यांनी प्रत्यक्षात उपस्थित राहून हे उपोषण मागे घेण्याची विनंती केली होती, तसेच लवकरच बँकेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. सरकारी यंत्रणेचा ढिसाळपणा किती टोकाचा असू शकतो, यावरून दिसून येते. सहकार आयुक्त अनिल कवडे यांच्या आश्वासनाला आता तब्बल एक वर्षाचा कालावधी उलटून गेला. परंतु अद्यापही बँकेत भ्रष्टाचार करणाऱ्यांवर म्हणावी तशी कारवाई झालेली नाही. त्यामुळे पुन्हा एकदा उपोषणकर्त्यांनी आता उपोषणाचे हत्यार उपसले आहे. दरम्यान, उपोषणकर्त्यांनी मागणी केली आहे की, बँकेच्या संपूर्ण भ्रष्ट व्यवहारांची चौकशी करावी तसेच दोषींवर कठोर कारवाई तात्काळ सुरू करावी. उपोषणकर्त्यांनी एकीकडे सहकार आयुक्तांकडे, तर दुसरीकडे जलसंपदा विभागाच्या प्रधान सचिवांकडेही पत्रव्यवहार करून आपली कैफीयत मांडली आहे.

उर्वरित पान २ वर...




**आम्ही काही दिवसांपासून जिजाऊ कमर्शियल बँक अमरावती यांची पोलखोल केली असून त्यांनी केलेल्या प्रत्येक खोट्या आरोपाला त्यांनाच त्यांच्या तोंडघशी पाडले असून बँकेच्या स्थापनेपासून प्रशासनाची व ग्राहकांची दिशाभुल करणाऱ्या एक हाती कारभार करणाऱ्या अध्यक्ष व संचालक यांना चांगलेच धारेवर धरून २०२३ निवडणूक प्रक्रिया लावे पर्यंत आमचा पाठपुरावा सुरूच होता व आता पुढील प्रत्येक सत्रात जो पर्यंत दोषींवर कारवाई होत नाही हे सत्र असेच सुरू राहणार**

# महामार्गावरील बॅरिअर पट्टया घेऊन जातांना पोलिसांनी दोघांना पकडले...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

सिंदखेड राजा ते मेहकर राज्य महामार्गावर लावण्यात आलेल्या बॅरिअर पट्ट्याच खोलून नेण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. नागरिकांच्या जीवित्वास धोका निर्माण झाल्यास अपघाताच्या दृष्टीने सुरक्षा म्हणून लावण्यात आलेल्या बॅरिकेट्स वरच चोरटे हात साफ करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर किनगावराजा पोलिसांनी ५ लाख ५४ हजारांचा मुद्देमाल जप्त करत मेहकर तालुक्यातील दोघांना अटक केली आहे. तर दोघे फरार झाले आहे हि घटना दि.९ डिसेंबर रोजी उघडकीस आली.

याबाबत सविस्तर असे की, दुसरबीडहुन मेहकरकडे जात असताना ३ कि.मी. अंतरावर दुसरबीड शिवारातील राज्य महामार्ग क्रमांक ७५३ सी वरील नगरमाळावरील अपघाताच्या दृष्टीने सुरक्षेकरिता रोड लगत लवलेल्या कॅश बरियर पट्टया खोलतांना काही अनोळखी व्यक्ती गावातील नागरिकांनी बघितले. यावरून नागरिकांनी किनगावराजा पोलिसांना संपर्क केला असता यातील आरोपी वैभव वाळुकर रा.कनका ता.मेहकर व माधव वाघ रा.मोहना खुर्द ता.मेहकर मिळुन आले तर आरोपी दडू हांडे व बालू ठोकळ दोघे रा.कनका ता.मेहकर हे फरार झाले.

यावेळी कॅश बरियर पट्टया २३ नग अंदाजे किंमत प्रत्येकी दहा हजार रुपये प्रमाणे २ लाख ३० हजार रुपये, प्रेशर पटया २३ नग अंदाजे किंमत प्रत्येकी १ हजार रुपये प्रमाणे २३ हजार रुपये, नट बोल्ट अंदाजे १ हजार रुपये असा एकुन २ लाख ५४ हजार रुपयाचा मुद्देमाल पांढ-या रंगाची महिंद्रा कंपनीचे बोलेरो क्रमांक एम. एच २८-ए. बी.३६२९ अंदाजे किंमत ३ लाख रुपये असा एकूण ५ लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून वैभव वाळुकर व माधव वाघ यांना अटक करण्यात आली आहे.

पोलीस कॉन्स्टेबल शिवाजी बारगजे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून २८७/२०२३ कलम ३७९,३४ भादवी,




सहकलम ३ सार्वजणीक संपती नुसकान प्रतिबंद अधि, सन १९८४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ठाणेदार दत्तात्रय वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार गणेश डोईफोडे, नाजीम चौधरी हे करत आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# काँग्रेसचे खा.साहू यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला भाजपा महिलांनी काळे फासून मारले जोडे...

**जनसंचलन/बुलढाणा**

झारखंड राज्यातील काँग्रेसचे राज्यसभा सदस्य खा. श्री धीरज साहू यांच्यावर कर विभागाने छापे मारून त्यांच्याकडून ३५० कोटी रुपयांच्या वर अवैद्य रोकड जप्त केली आहे व हा आकडा वाढतच आहे.या अशा खासदार व भ्रष्टाचारी काँग्रेस प्रवृत्तीच्या विरुद्ध आज भाजपा लोकसभा निवडणूक प्रमुख माजी आमदार विजयराज शिंदे यांच्या नेतृत्वात तसेच भाजपा महिला मोर्चाच्या वतीने आज दि.११.१२.२०२३ रोजी वसंतराव नाईक चौकात खा. धीरज साहू यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला चपला मारून काळे फासण्यात आले व काँग्रेसचा निषेध नोंदवण्यात आला. जनतेच्या घामाच्या पैशावर अश्याप्रकारे डल्ला मारणाऱ्या एका खासदाराकडे एवढी संपत्ती असेल तर काँग्रेसच्या इतर नेत्यांकडे किती असेल? याचा अंदाज सुद्धा आपल्या अवाक्या बाहेरचा आहे. मागील सहा दिवसांपासून कर विभागाचे ५० कर्मचारी रोकड हस्तगत करीत असून यात वाढत होत जात आहे. काँग्रेसची ही भ्रष्टाचारी प्रवृत्ती, हा चेहरा खऱ्या अर्थाने जनतेसमोर समोर येत आहे त्यामुळे काँग्रेस मुक्त भारत निर्माण करण्याची वेळ जवळ आली आहेङ्कङ्क अशा खरपूस शब्दात भाजपा नेते विजयराज शिंदे यांनी काँग्रेसचे खासदार व काँग्रेस पक्षाचा निषेध व्यक्त केला. यावेळी भाजपाच्या महिला मोर्च्या जिल्हा सरचिटणीस सौ उषाताई पवार, महिला जिल्हा उपाध्यक्ष सौ अल्काताई पाठक, माजी नगरसेविका सौ वैजंतीताई कस्तुरे, सौ योगिताताई बढे ई महिलांनी खा.साहू यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला चपला मारून काळे फासले. तसेच सदर खासदार व काँग्रेसच्या मुर्दाबाद घोषनांनी परिसर दणाणून सोडला. या निषेध आंदोलनात भाजपा तालुका



अध्यक्ष मोहन पवार भाजपा कामगार मोर्चा प्रदेश सचिव श्री विश्राम पवार कामगार मोर्चा प्रदेश प्रतिनिधी श्री अण्णासाहेब पवार, शहराध्यक्ष श्री अनंता शिंदे कामगार मोर्चाचे जिल्हाध्यक्ष दत्ता शिंदे सतीश पाटील , शिक्षक आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रा भगवान गरुडे, श्री रदाळकर श्री संजय साखरे, किसान मोर्चा जिल्हा सरचिटणीस मंदार बाहेकर, माजी नगरसेवक अरविंद होंडे कामगार मोर्चा तालुकाध्यक्ष,राजेंद्र पवार , एड. दशरथसिंग राजपूत, अनिकेत गवळी, अमोल जाधव डॉक्टर, यांसह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या उपस्थित होते.

## पान १ वरून जिजाऊ बँकेच्या भ्रष्टाचाराच्या...

दरम्यान, उपोषणकर्त्यांच्या या नोटिशीने कोठाळे व त्यांच्या काही लुटारू संचालकांमध्ये मोठी खळबळ उडालेली आहे तर आहेच, परंतु सहकार खात्यातही खळबळ माजली आहे. कारण एक वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील सहकार विभागाने दोषींवर कारवाई करण्यासाठी म्हणावी तशी हालचाल केली नाही. हे नेमके काय गौडबंगाल आहे, हे जाणून घेण्याची उत्सुकता आज प्रत्येकाला आहे. सरकारी यंत्रणेचे काम खरंच इतके ढिसाळ आहे की, जिजाऊ बँकेची चौकशी न लागण्यासाठी काही अर्थपूर्ण हालचाली झाल्यात, याबबत तर्कवितर्क लढवले जात आहेत. दुसरीकडे कोठाळे व त्यांचे संचालक हे आता बँकेच्या निवडणुकांना सामोरे जात आहेत. ३१ डिसेंबर रोजी बँकेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. या स्थितीत कोठाळे व त्यांच्या लुटारू संचालकांच्या विरोधात उपोषण होणे, हे नक्कीच त्यांना परवडणारे असणार नाही. कोठाळे यंदाच्या निवडणुकीत पुन्हा निवडून येण्यासाठी आटापीटा करीत आहेत, मात्र त्यांना ही निवडणूक चांगलीच जड जाण्याची शक्यता आहे. कारण कोठाळे यांचा भ्रष्ट कारभार आता चव्हाट्यावर आलेला आहे. त्यामुळे बँकेचे सुजाण मतदार कोठाळे यांना पुन्हा निवडून देण्याची शक्यता नाही. कोठाळे यांचा भ्रष्ट कारभार दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने सातत्याने उघडा पाडला आहे. त्यातच आता या उपोषणाची भर पडल्याने कोठाळे व त्यांच्या काही संचालकांची नक्कीच झोप उडालेली असणार.

सुज्ञ मतदारांनी वेळीच जागृत होणे गरजेचे काहीही असले तरी बँकेच्या सुजाण मतदारांना आमचे आवाहन आहे की, कोठाळे व त्यांच्या काही संचालकांचा कारभार अत्यंत भ्रष्ट आणि मनमानी आहे. त्यांनी बँकेला अडचणीत आणून स्वतःच्या तुंबड्या भरल्या आहेत. कोठाळे आज मतदारांना खोटी माहिती पुरवून त्यांची दिशाभूल करीत आहेत. ते बँकेचे अवास्तव चित्रण करीत असल्याचे स्पष्ट आहे. बँकेची आजची स्थिती अजिबात चांगली नाही. परंतु कोठाळे हे मान्यही करणार नाहीत आणि कोणाला सांगणार देखील नाहीत. त्यामुळे मतदारांनी सजग होण्याची गरज आहे.

# आरोग्यवर्धिनी केंद्र नांदुरा परिसरा मध्ये घाणीचे साम्राज्य...




**जनसंचलन/ नांदुरा**

तालुक्यातील आरोग्यवर्धिनी केंद्र नांदुरा येथे कोणत्याही प्रकारची स्वच्छता केली जात नाही. असे दिसून येते तालुक्यातील सर्व गोरगरीब जनता आपल्या बिमारीचा इलाज करण्यासाठी नांदुरा येथे येत असतात पण या आरोग्यवर्धिनी केंद्र नांदुरा येथे कोणत्याही प्रकारची स्वच्छता केली जात नाही,

केंद्र सरकार असो की राज्य सरकार असो स्वच्छतेवर कोट्यावधी रुपये खर्च करून सुद्धा या केंद्राला स्वच्छ परिसर ठेवनची आवश्यकता आहे , अधिकारी वर्गाचे या घाणीकडे कोणत्याही प्रकारचे लक्ष देत नसल्यामुळे घाणीचे साम्राज्य झाले आहे, या आरोग्यवर्धिनी केंद्र नांदुरा येथे लहान, मोठे, गर्भवती महिला या केंद्राकडे आपला इलाज करण्यासाठी दवाखान्यांमध्ये येतात,शासनाचा भरमसाठ निधी उपलब्ध होत असूनही गरोदर महिला, अपंग बांधव आणि विविध रोगाविषयी त्रस्त असलेल्या रुग्णांना अपुऱ्या सुविधा मिळत असल्याची नागरिकान कडून खंत,

तसेच तालुकास्तरावर आरोग्यवर्धिनी केंद्र असून या केंद्रामध्ये नागरिकांना पाण्याची व्यवस्था केली जात नाही, तसेच अनेक प्रकारच्या सुविधा नागरिकांना देण्यात येत नाही, वरिष्ठ अधिकारी याकडे लक्ष देतील का? सरकार या आरोग्य विभागावर एवढा मोठा खर्च करून हे आरोग्य वर्धिनी केंद्र नांदुरा का परिसर स्वच्छ ठेवत नाही? याकडे सर्वसामान्य लक्ष लागले आहे.

मिटकॉन कन्सल्टन्सी अँड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस लि.पुणे
MITCON™
Solutions for Sustainable Tomorrow
मिटकॉन नेचर बेस्ड सोल्युशन्स लिमिटेड
महोगनी विश्व ॲग्रो लिमिटेड
MAHOGANI VISHWA AGRO
कृषि-वानिकी : शाश्वत विचार!
देईल पर्यावरण संरक्षणासोबत आर्थिक समृध्दी!
MITCON NATURE BASED SOLUTIONS




कृषि-वानिकी : १.भारत हा कृषिप्रधान देश आहे, उत्तम प्रकारची जमीन व हवामान अनुकूल असल्याने कृषि-वानिकीच्या माध्यमातून उत्तम लाकूड निर्मिती हे संस्थेचे ध्येय आहे.
महोगनी लागवडीचे नियोजन: १.पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन असावी.
रोपांची लागवड पध्दती :- • एक एकर क्षेत्रासाठी ४४४ रोपे लागतील.
• लागवडीचे अंतर १०X१० फूट किंवा ८X१२ फूट असावे.
• सरासरी खड्यांची लांबी, रुंदी व खोली १.५ X १.५ X १.५ फुटाची असावी.
भारतात लाकूड उद्योगातील संधी: १. निर्यातक्षम लाकूड निर्मिती करुन ग्रामीण भागात उद्योग व रोजगार निर्मीती करणे.
मिटकॉनद्वारे शेतकऱ्यांना मिळणार कार्बन क्रेडिट
महोगनी कृषि-वानिकी लागवडीतून विश्वातील पहिला कार्बन क्रेडिट प्रकल्प

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# आता मिटकॉनद्वारे शेतकऱ्यांना मिळणार कार्बन क्रेडिट...

## महोगनी कृषि-वानिकी लागवडीतून विश्वातील पहिला कार्बन क्रेडिट प्रकल्प

### बुलढाणा तालुक्यातील भादोला वाडी येथील अनिल जयराम उबरहांडे यांनी आपल्या १ एकर मध्ये ४४४ महोगनीचे वृक्ष लावले








**जनसंचलन/बुलढाणा**

पर्यावरण संतुलन अबाधित राखण्यासाठी मिटकॉन कन्सल्टन्सी अँड इंजिनीरिंग सर्व्हिसेस लिमिटेड, मिटकॉन नेचर बेस्ड सोल्युशन्स व महोगनी विश्व ॲग्रो लिमिटेडच्या माध्यमातून महोगनी लागवड केलेल्या शेतकऱ्यांना कार्बन क्रेडिटचा मोबदला मिळणार आहे. कृषी वनीकरण व पुनर्वनीकरण (Afforestation and Reforestation) प्रकल्पाला वेरा (VERRA) रजिस्ट्री अंतर्गत यशस्वीरीत्या प्रमाणित केले आहे. या यशाचे सर्वत्र ठिकाणावरून कौतुक होत आहे. महोगनी कृषि-वानिकी हा प्रकल्प सध्या महाराष्ट्र, मध्यप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा आणि गुजरात राज्यांमध्ये तसेच बुलढाणा जिल्ह्यातील भादोला वाडी येथे मोठ्या प्रमाणात सुरू असून यापुढे शेतकऱ्यांना विविध पिकांद्वारे कार्बन क्रेडिट उपलब्ध होईल. मिटकॉनची कृषी वनीकरण पद्धती पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत शेतीच्या विकासासाठी साहाय्यभूत ठरते. शेतकरी बंधूंच्या सहकाऱ्यांने व्यावसायिक तत्वावर सहा हजार एकरवर महोगनी लागवड करण्यात आली आहे. मिटकॉनचा भारतातील महोगनी लागवड हा उपक्रम आंतरराष्ट्रीय स्वच्छ विकास यंत्रणा (CDM) कार्यपद्धती मानकांचे अनुपालन करतो आणि मिटकॉनने जागतिक वृक्ष आधारित कार्बन क्रेडिट मार्केटमध्ये सहभागी होऊन शेतीचा शाश्वत विकास व शेतकरी आर्थिक सक्षमीकरणाचा पर्याय उपलब्ध केला आहे. महोगनी लागवडीचे नियोजनासाठी पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन असावी.रोपांची लागवड पद्धती हि एक एकर क्षेत्रासाठी ४४४ रोपे लागतील.लागवडीचे अंतर १० बाय १० फूट किंवा ८ बाय १२ फूट असावे सरासरी खड्ड्याची लांबी रूंदी व खोली १.५बाय१.५बाय१.५ फूटाची असावी.भारतातील लाकूड उद्योगातील संधी निर्यातक्षम लाकूड निर्मिती करून ग्रामीण भागात उद्योग व रोजगार निर्मिती करता यते.हे लाकूड इमारती,बांधकाम क्षेत्र,कागद निर्मिती,प्लायवूड, पॅनल्स,फर्निचर,हस्तकला आणि खेळणी यासह विविध प्रकारच्या उद्योगांसाठी लाकडाची आवश्यकता आहे.भारतातील२०२० मध्ये ५७ दशलक्ष घनमीटर लाकडाची मागणी होती तर २०३० मध्ये ९८ दशलक्ष घनमीटर असणार.कार्बन क्रेडिट कृषी वानिकीकडे कार्बन क्रेडिट मिळवून देणारे आर्थिक उत्पन्नाचे साधन म्हणून ओखलले जाते.कार्बन क्रेडिट प्रणालीची संकल्पना अधिकृतपणे क्योटी प्रोटोकॉलमध्ये १९९७ औपचारिकपणे मांडण्यात आली ज्यामध्ये उत्सर्जन कमी करण्यासाठी आर्थिक प्रोत्साहन दिले जाते.

#### अनिल उबरहांडे यांच्या १ एकर मध्ये ४४४ झाडांची लागवड

**महोगनी कृषी वानिकी लागवडीतून विश्वातील पहिला कार्बन क्रेडिट प्रकल्प सुरू झालेला आहे. या प्रकल्पात बुलढाणा जिल्ह्याने सुध्दा आपले योगदान दिलेले आहे.बुलढाणा तालुक्यातील भादोला वाडी येथे राहणारे श्री अनिल जयराम उबरहांडे यांनी त्यांच्या १ एकर शेतात महोगनीची एक नव्हे तर तब्बल ४४४ झाडांची लागवड केली आहे.या झाडांमुळे शेतकऱ्यांना तर बराच फायदा होणार आहे.**



---

## मालवाहक ट्रकची स्कुटीला धडक महिला गंभीर जखमी...

### बुलढाणा येथील संगम चौकातील घटना

**जनसंचलन/बुलढाणा**




अपघाताचे सत्र हे काही थांबायाचे नाव घेत नाही आहे.तसेच याला दुसरे कारण हे समोर येत आहे बुलढाणा शहरात ट्राफिक हि मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. जिल्ह्यात सतत अपघाताची मालिका सुरू आहे.रोज कुठेना कुठे हे अपघात होत आहे.भरधाव मालवाहक ट्रकने स्कुटीला मागून जोरदार धडक दिल्याची घटना दि ११ डिसेंबर रोजी स्थानिक संगम चौकात सकाळी ८:३० वाजे दरम्यान घडली. अपघातामध्ये सुनीता संदीप पंडित (३० वर्ष) या गंभीर जखमी झाल्या. अपघातानंतर त्यांना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले. परंतु त्यांची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना पुढील उपचारासाठी छ. संभाजीनगर येथे हलविले आहे. संगम चौक मध्ये अपघात झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी जमा झाली होती.एम. एच.२८ एबी.७३७७ क्रमांकाच्या टिप्पर गाडीने स्कुटीला मागून धडक दिल्याने अपघात घडला. घटनेची माहिती मिळताच बुलढाणा शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.अपघाता मधील टिप्पर बुलढाणा शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास बुलढाणा शहर पोलिस करीत आहे.

## एसटी बस थांब्यावरील हॉटेल,मॉल व ढाब्यावर ३० रु नाश्ता मिळावा मीडिया अशोशिएशन ऑफ इंडियाचे निवेदन...

### स्टिकर प्रत्येक बस व हॉटेल, मॉल व ढाब्यावर दर्शनी भागात चिटकवून प्रवाशांची आर्थिक लूट थांबवावी...


**वृत्तसंस्था/मुंबई**

मीडिया अशोशिएशन ऑफ इंडिया च्या वतीने एसटी बस थांब्यावरील हॉटेल,मॉल व ढाब्यावर ३० रु नाश्ता मिळणेबाबत निवेदन देण्यात आले. मुंबई सेंट्रल एस टी बस आगाराचे नव्याने पद भार स्वीकारलेले विपीनवार यांना सह सचिव चेतन काशीकर, अनिल चासकर आणि वैजयंता मोरे यांनी निवेदन दिल्यानंतर एस टी चे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक विपनिवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. माई च्या संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष शीतल करदेकर यांनी सांगितले की, आज सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या ५८५ बस स्थानकातील १५ हजार ५१२ बसेस दररोज राज्यभरात धावत असतात.या बसेस मधून महिला,पुरुष व लहान मुले असे एकूण ८.७ मिलियन (८७लाख) प्रवाशी यात्रा करतात. महामंडळास या पोटी दररोज जवळपास २४ कोटींचे उत्पन्न प्राप्त होते. सदरच्या १५ हजार ५१२ बसेस एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी धावत असतानां रस्त्यावर ढाबे, हॉटेल व मॉल आदी ठिकाणी नाश्ता व जेवणासाठी बसेस हमखास थांबतात.अशा सर्व थांब्यावर मालक, व्यवस्थापनाकडून प्रवाशांकडून मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट केली जाते.मनमानी दर आकारले जातात.विचारपूस केल्यास उद्धट उत्तरे मिळतात.अनेक ग्रामीण प्रवाशी आपल्या सोबत एक वेळेचे जेवण आणतात ते जेवण करण्यासाठी हॉटेलमध्ये जेव्हा जातात तेंव्हा काही हॉटेलमध्ये घरच्या जेवणास मनाई केली जाते.किंबहूना हॉटेलमध्ये ठळक अक्षरात लिहिलेले असते येथे बाहेरचे अन्न पदार्थ आणण्यास व खाण्यास सक्त मनाई आहे प्रथमतः ही अट रद्द करण्यास भाग पाडावे. ज्या, ज्या थांब्यावर बस थांबतील मग ते हॉटेल असो , मॉल असो किंवा ढाबे असो तेथे गेल्यावर प्रवाशांनी आपले बस तिकीट हॉटेल व्यवस्थापनास दाखवल्यास



त्यांना केवळ ३० रुपयांत नाश्ता द्यायला हवा. मात्र असे कुठंही होतांना दिसत नाही. माईचे मुंबई चे संघटन सचिव चिटणीस यांनी सूचित केले की, ज्ञ्प्रवाशांचा विचार करून परिवहन मंडळाने, तात्काळ अंमलबजावणी करण्यासाठी संबंधितांना तसे आदेशाचे पत्र पाठवून बस प्रवाशांना केवळ ३० रुपयांत नाश्ता मिळेल असे स्टिकर प्रत्येक बस व हॉटेल, मॉल व ढाब्यावर दर्शनी भागात चिटकवून प्रवाशांची आर्थिक लूट थांबवावी, अन्यथा आम्हांला पर्यायी मार्ग अवलंबावा लागेल.

# सरकारला शेतकऱ्यांचा कळवळा असेल तर पंचनाम्याचं थोतांड थांबवून कर्जमाफी करावी : उद्धव ठाकरे



**वृत्तसंस्था/ नागपूर**

मुख्यमंत्र्यांनी एक रुपयात विमा योजना आणली. त्या अंतर्गत पावणे दोन कोटी शेतकऱ्यांनी विमा घेतला. त्यापोटी ८ हजार कोटींचा हिस्सा सरकारने भरला. जनतेचा हा पैसा सरकारच्या मित्रांच्या कंपन्यांच्या खिशात गेला का, ८ हजार कोटी कोणाच्या बोडख्यावर गेले, असा सवाल शिवसेनाप्रमुख (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उद्धव ठाकरे यांनी सोमवारी विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना उपस्थित केला.

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी उद्धव ठाकरे विधान परिषदेच्या कामकाजाला हजर राहिले. यावेळी त्यांनी विधानभवन परिसरात पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले,ङ्कपिकांचे नुकसान झाल्यानंतर ७२ तासांच्या आत कळवा, असे विमा कंपन्या म्हणतात. पण, ७२ तासानंतरही विमा कंपन्यांचे फोन आणि दारे-खिडक्या बंद आहेत. अवकाळी पाऊस, दुष्काळ, गारपीट यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यांच्यावर कर्जाचा डोंगर चढला आहे. बँकांकडून कर्जाचा तगादा लावला जात आहे. आज त्यांचा कुणीही वाली नाही. शेतकरी आपले अवयव विकायला तयार झाले आहेत. अशी परिस्थिती यापूर्वी कधीही शेतकऱ्यांवर आली नव्हती. मी मुख्यमंत्री असताना कर्जमाफी केली होती. या सरकारला कळवळा असेल तर पंचनाम्याचे थोतांड बंद करून कर्जमाफी करायला हवी.ङ्कधारावीच्या पुनर्वसनावर बोलताना ते म्हणाले,ङ्कधारावीकरांचे पुनर्वसन व्हायला पाहिजे. मात्र, आम्ही संपूर्ण मुंबई अदानी-अंबानींच्या घशात घालू देणार नाही. तिथे टीडीआरची सक्ती करायला नको. तरीदेखील टीडीआर बँक बनवायची असेल तर त्याची मालकी सरकारकडे असायला हवी. अदानीकडे नाही.ङ्कआम्ही राष्ट्रपतींना निवेदन दिले आहे की, ज्यांना-ज्यांना आरक्षण हवे आहे त्यांना-त्यांना देण्यात यावे. पण, दुसऱ्या कुणाचे आरक्षण कमी न करता ते देण्यात यावे, अशी भूमिका असल्याचे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले.दोन्ही उपमुख्यमंत्री एकमेकांच्या बाजूला बसलेले असतानाही त्यांना पत्र द्यावे लागत आहे. प्रत्यक्षात त्या पत्राचे उत्तर कधीही मिळणार नाही, हे स्पष्ट आहे. भाजपने नवाब मलिकांबाबत व्यक्त केलेल्या तीव्र भावनांचा आम्ही आदर करतो. पण, नवाब मलिकांना जो न्याय लावला तो प्रफुल्ल पटेलांना लावून तुम्ही त्यांच्यापासून अंतर ठेवणार का, असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला.३७० कलम हटविले गेल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवल्याचा आनंद आहे. सर्वोच्च न्यायालयाला मी धन्यवाद देतो. ते कलम हटविण्यासाठी शिवसेनेचाही आग्रह होता. आम्हीदेखील त्यांचे समर्थन केले होते. त्यामुळे आता मोकळ्या वातावरणात तिथे निवडणुका होतील.

## रांगोळींनी सजवत फुले वाहून खड्ड्यांचे केले पूजन!

### वंचित युवा आघाडीचे आंदोलन : खडतर रस्त्याकडे अभिनव पद्धतीने वेधले लक्ष...

**जनसंचलन/बुलढाणा**

येळगावच्या हद्दीत येणाऱ्या हाजी मलंग दर्गा ते शरद कला महाविद्यालय परिसरापर्यंतच्या रस्त्याची पूर्णत: वाट लागली आहे. जेथे पाऊल टाकावे, तेथे खड्डे असल्याने पादचाऱ्यांसह वाहनधारक कमालीचे वैतागले आहेत. या खडतर रस्त्याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवार, ११ डिसेंबर रोजी वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने खड्ड्यांना रांगोळींनी सजवण्यात आले आणि त्याच खड्ड्यांचे फुले वाहून पूजन करण्यात आले. वंचित युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष सतीश पवार यांच्या नेतृत्वात आंदोलन करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत आदेश द्यावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली. रस्त्याच्या झालेल्या दुर्दशेबाबत प्रशासनाविरोधात आंदोलनस्थळी घोषणाबाजीही करण्यात आली. चिखली रोडवरील हाजी मलंग दर्गा ते शरद कला महाविद्यालयापर्यंतच्या रस्त्याची पांदण रस्त्यापेक्षाही वाईट अवस्था झाली आहे. या भागात मोठी लोकवस्ती आहे. कायम रहदारीचा असलेल्या रस्त्यावर नेहमीच अपघात घडतात. काही जण पडून जायबंदी झाले आहेत. राजकीय नेत्यांची उदासीनता व स्थानिक नागरिकांचा आपल्या अधिकाराप्रती असलेला बेसावधपणा, यामुळे बुलढाणा शहर व परिसर खड्डेमय बनत चालल्याचा आरोप सतीश पवार यांनी यावेळी केला. जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने काम पूर्ण करण्यासाठी आदेशित करावे; अन्यथा वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, त्याचप्रमाणे भविष्यात जाहीरपणे स्थानिक रहिवाशांनी मतदानावर बहिष्कार घालावा, अशा स्वरूपाची जागृती केली जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या आंदोलनात अर्जुन खरात, बाला राऊत, दिलीप वाघमारे, ॲड. कैलास कदम, लहासे, सुरेश जाधव, अशोक हिवाळे, समाधान पवार, शुभम पवार, मोहन औताडे, अनिल पारवे, योगेश हिवाळे, आकाश आराख, किरण पवार यांच्यासह पदाधिकारी



व नागरिक सहभागी झाले होते.

**कर मिळूनही दोन्ही ग्रामपंचायतींची उदासीनता**

सुंदरखेड व येळगाव ग्रामपंचायतींच्या अंतिम हद्दीवर हा भाग वसलेला आहे. या वस्तीमधील रहिवासी बहुतांश कर्मचारी आहेत. त्यापैकी अनेकांची नावे मतदार यादीत नाहीत. त्यामुळे दोन्ही ग्रामपंचायती त्या भागातील नागरिकांप्रती उदासीन आहेत. परिसरामधील शंभर टक्के भाग हा अकृषक असून त्याचा करुपी लाभ दोन्ही ग्रामपंचायतींना मिळतो. स्थानिक राजकीय नेत्यांची उदासीनता व कमिशन खोरी यामुळे त्या रस्त्याचे काम बऱ्याच वर्षांपासून रखडल्याचा आरोप निवेदनाद्वारे करण्यात आला आहे.

## मोदींच्या मेक इन इंडियामध्ये कांदा बसत नाही का? शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून बच्चू कडू आक्रमक...



**वृत्तसंस्था/नागपूर**

सरकारने धोरणाने शेतकऱ्यांना मारले. सत्ता बदलते, मात्र शेतकऱ्यांच्या स्थितीत फारशी सुधारणा झाली नाही. जाती, धर्मांच्या चर्चेत लोकांना गुंतवून ठेवले. पेट्रोल, डिझेलचे दर वाढले. खर्च दुप्पट होत आहे. असे असतानाही सरकार शेतकऱ्यांसाठी चुकीच्या योजना आणत आहेत. पंतप्रधान मोदींच्या मेक इन इंडियामध्ये कांदा बसत नाही का? असा सवाल आमदार बच्चू कडू यांनी विचारत सरकारच्या धोरणांवर टीकास्त्र सोडले.मी पक्षासोबत बेईमानी करेल, मात्र शेतकरी या माझ्या बापासोबत करणार नाहीङ्क असे म्हणत बच्चू कडू यांनी सरकारवर टीकास्त्र सोडले. ५ लाखांच्या बजेटमध्ये शेतकऱ्यांच्या वाट्याला केवळ २३ हजार कोटी आले. बजेटमध्ये शेतकऱ्यांचे स्थान नगण्य आहे. शेतकऱ्यांच्या संख्येनुसार बजेटमध्ये भागीदारी द्या. कोणत्याच पक्षात ही धमक नाही. सर्वात जास्त रोजगार देणारे क्षेत्र असूनही शेतकरी दुर्लक्षित आहे, असे बच्चू कडू म्हणाले. राज्यातील शेतकऱ्यांवर आलेल्या संकटावर अल्पकालीन चर्चे दरम्यान बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांवर सरकारचे लक्ष वेधले. केंद्राने कापसाचे ६ हजार भाव जाहीर केले. ८ हजार ८८६ दर मिळाला तर १५ टक्के नफा मिळतो. नफा न घेता माल विकावा लागत आहे. इतर पिकांचीही हीच स्थिती आहे. तिकीट मागण्यासाठी जावे लागत असल्याने आमदार शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोलताना सोईची भूमिका घेतात, असे म्हणत इतर आमदारांवरही त्यांनी टीका केली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याला वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी

| 8x8 cm | 5x8 cm | 5x8 cm |
|---|---|---|
| 1 Month=5000/- | 1 Month=3500/- | 1 Month=3500/- |
| 15 Day=3500/- | 15 Day=2200/- | 15 Day=2200/- |
| 7 Day=2000/- | 7 Day=1500/- | 7 Day=1500/- |
| Hight 8 cm, Width 8 cm | Hight 5 cm, Width 8 cm | Hight 5 cm, Width 23 cm |

एक दिवसाची जाहिरातः वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.

**One Day**

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| 2600/- | 1800/- | 1300/- |
|---|---|---|
| Hight 12 cm, Width 12 cm | Hight 8 cm, Width 10 cm | Hight 8 cm, Width 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी
केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही निःशुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस
फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्कः
अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958
पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com